# फोंडयात मुसळधार पावसामुळे भूस्खलन, संरक्षक भिंती कोसळल्या





■ टीम दैनिक हेराल्ड


**फोंडा, दि. १३ :** गुरुवारी रात्री झालेल्या चार तासांच्या जोरदार पावसामुळे उसगाव टाकीवाडा परिसरात भूस्खलन होऊन दोन घरांचे मोठे नुकसान झाले. सरपंच रामनाथ डांगी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरेश सोनार आणि प्रदीप पाल यांच्या घरांवर थेट मातीचा भराव कोसळला. अद्याप मुसळधार पावसाची शक्यता असल्यामुळे दोन्ही घरांना आणखी धोक्याची शक्यता आहे. सुदैवाने, घटनेच्या वेळी दोन्ही कुटुंबे घरात असतानाही कोणतीही जीवितहानी झाली नाही.

सिद्धेश्वरनगर येथील रेहनाबानू वाटी यांच्या घराचे रक्षण करणारी संरक्षक भिंत, कविता हिरेमती यांच्या घरावर कोसळली. या घटनेत दोन्ही घरांचे मोठे नुकसान झाले असून, संरक्षक भिंतीचा उर्वरित भाग त्वरित दुरुस्त न केल्यास रेहनाबानू यांच्या घरावर आणखी मलबा कोसळण्याची शक्यता आहे. पावसामुळे झालेल्या आणखी एका भूस्खलनात लक्ष्मी वरसेकर यांच्या घरालाही गंभीर भेगा पडल्या असून घर कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**▶ उसगाव टाकीवाडा परिसरात दोन घरांचे मोठे नुकसान**

सरपंच रामनाथ डांगी यांनी सांगितले की, त्यांनी या घटनेबाबत स्थानिक आमदार व आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांना माहिती दिली आहे. त्यांनी घटनास्थळी भेट देण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय, फोंड्याचे उपजिल्हाधिकारी शुभम नाईक यांना तसेच आपत्ती व्यवस्थापन पथकातील इतर अधिकाऱ्यांनाही परिस्थितीबाबत सूचित करण्यात आले आहे.

सरपंच डांगी यांनी सांगितले की, मुसळधार पावसामुळे उसगाव येथील सखल भागातील काही घरांमध्ये पाणी शिरले आहे. त्यांनी शासनाकडे पाहणी करून बाधित घरमालकांना तातडीने आर्थिक मदत व पुनर्वसन उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले आहे. फोंड्याचे अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले असून, आपत्कालीन परिस्थितीत मदतकार्य सुरू केले आहे.




# सावईवेरे येथील अनंत देवस्थानात १८ रोजी 'स्वर वर्षाव'

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १३ :** सावईवेरे येथील श्री अनंत देवस्थानात शेखर पालकर यांच्या गंधपुजेनिमित्त 'स्वर वर्षाव' हा नाट्य, भाव व भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम येत्या बुधवार दि. १८ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता येथील श्री अनंत देवस्थानात होणार आहे.

या कार्यक्रमात सिध्दी सुर्लकर पिळगावकर, विश्वजित मेस्त्री, तेजस वेर्णेकर व अमृता पेडणेकर हे गायक कलाकार सहभागी होणार असून त्यांना रोहित बांदोडकर (तबला), धनराज मडकईकर (संवादिनी) , बाळकृष्ण मेस्त (सिंथेसायझर), पवन वळवईकर (पखवाज), आश्विन जाधव (ऑक्टोपॅड) हे साथसंगत करतील. ध्वनी प्रयोजन दुर्गेश आजगावकर यांचे असून सिध्दी उपाध्ये या निवेदनाची बाजू सांभाळणार आहेत. तरी सर्व भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

# 'गोवा २०३७' व्हिजन रिपोर्ट सादर

■ टीम दैनिक हेराल्ड

**उद्योग, प्रशासन आणि नागरी समाज एकत्र**

**पणजी , दि. १२ ::** गोव्याच्या भविष्यासाठी एक महत्वाकांक्षी आणि व्यापक आराखडा म्हणून गोवा २०३७ ' व्हिजन रिपोर्ट नुकताच पणजीत आयोजित ऐतिहासिक परिषदेत सादर करण्यात आला. गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (जीसीसीआय ) यांच्यावतीने आयोजित या दिवसभराच्या परिषदेचे उद्घाटन उद्योगमंत्री माविन गूदिन्हो यांच्या हस्ते, तर समारोप मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी मुख्यमंत्री सावंत यांच्या हस्ते हेरिटेज टू होरायझन ग्रीन अँड इन्क्लूसिव्ह' या संकल्पनेवर आधारित व्हिजन रिपोर्ट औपचारिकपणे प्रसिद्ध करण्यात आला.

जीसीसीआय अध्यक्ष श्रीनिवास धेंपे यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, गोव्याने आता पर्यटन आणि खाणकाम या पारंपरिक आर्थिक आधारांवरून पुढे जात नवोपक्रम, पर्यावरणीय जबाबदारी आणि समावेशकता यावर आधारित नवा मार्ग स्वीकारायला हवा. गोवा एका निर्णायक टप्प्यावर उभा आहे. पुढील दशकात आपले राज्य जागतिक स्तरावर स्पर्धात्मक, आर्थिकदृष्ट्या गतिमान आणि सामाजिकदृष्ट्या सुसंवादी व्हावे, यासाठी हा अहवाल दिशादर्शक ठरेल, असे धेंपे म्हणाले.

उद्योगमंत्री माविन गूदिन्हो यांनी या रिपोर्टमधील शिफारशी राज्य सरकारसाठी प्रभावी ब्लूप्रिंट ठरतील असे सांगून जीसीसीआय च्या उपक्रमाचे कौतुक केले. यावर पुढे बोलताना मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले की, जीसीसीआय चा व्हिजन डॉक्युमेंट हा एक विचारपूर्वक सादर केलेला प्रस्ताव आहे आणि सरकार आपल्या स्वतःच्या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये (डिसेंबर २०२५ पर्यंत प्रकाशित होणारे) त्याचा योग्य विचार करेल. त्यांनी गोवा व्हिजन२०३७ स्टीयरिंग कौन्सिल' स्थापनेच्या जीसीसीआयच्या प्रस्तावालाही सकारात्मक प्रतिसाद दिला.

गोवा इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट (जीआयएम ) यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या अहवालात १२ क्षेत्रीय कार्यदलांच्या सल्लयाचा समावेश असून, पायाभूत सुविधा, पर्यटन, नवोन्मेष, कौशल्य विकास, शाश्वतता आणि प्रशासन – हे सहा क्रॉस–कटिंग धोरणात्मक स्तंभ ठळकपणे मांडण्यात आले आहेत. जीसीसीआय च्या अंदाजानुसार, या एकात्मिक व्हिजन प्लॅनमुळे २०३० पर्यंत राज्यात सुमारे १५ हजार कोटी रुपयांची खाजगी गुंतवणूक आकर्षित होऊ शकते आणि १ लाखाहून अधिक कुशल नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. यासोबतच राज्याच्या अर्थव्यवस्थेतील कार्बन उत्सर्जन ५० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्टही यामध्ये आहे.

परिषदेच्या समारोपात, श्रीनिवास धेंपे यांनी सरकार, उद्योग क्षेत्र आणि शैक्षणिक संस्थांमध्ये दीर्घकालीन सहकार्य निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कल्पना आणि आकांक्षा पुरेशा नाहीत, त्यांना कृतीत आणण्यासाठी तीनही क्षेत्रांची भागीदारी अत्यावश्यक आहे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी जीसीसीआय च्या या अहवालातील निरीक्षणे आणि प्रस्तावांचे कौतुक करताना म्हटले की, हा केवळ एक उद्योग क्षेत्राचा दस्तऐवज नाही, तर गोव्याच्या सर्वांगीण विकासासाठी नागरी समाजाला, शैक्षणिक संस्थांना आणि शासकीय यंत्रणांना एकत्र आणणारा रोडमॅप आहे.

गोवा २०३७ ' हा अहवाल एका बदलाच्या दिशेने पहिला ठोस टप्पा मानला जात आहे. पर्यावरण, रोजगार, सामाजिक समावेशकता आणि नवोन्मेष यांचा समतोल साधत शाश्वत विकास साध्य करण्याचा ध्यास या परिषदेने घेतला आहे. गोव्याच्या विकासाच्या नकाशावर ही परिषद आणि अहवाल एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरणार आहेत.



# पावसाच्या आगमनाने शेतकरी सुखावला

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १३ :** तब्बल पंधरा दिवसांच्या अंतराने पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी वर्ग किंचित सुखावला असून उकाड्याने त्रस्त नागरिकांनी सुस्कारा सोडला. पावसामुळे शेतीच्या कामाला वेग येण्याची शक्यता आहे,शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त होईल,मात्र बामणभाटीतील जमिनीविषयी सरकारी खात्याच्या दुर्लक्षामुळे संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, या जमिनीच्या वळणावरील जागेतून जुनस नदीत पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था केल्यास शेत जमिनीत दुबार पीक घेण्याची संधी शेतकऱ्यांना मिळणार व शेतकरी स्वयंपूर्ण होऊ शकतो,असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

या भागात गेले पंधरा दिवस असह्य उकाडा झाल्याने पर्यटक तसेच नागरिक हवालदिल झाले होते. ऐन पावसाळा व मृग नक्षत्र असूनही पावसाने दडी मारली होती.मध्यंतरी अवकाळी पावसाने आठ दहा दिवस सलग हजेरी लावल्याने शेतकरी तसेच नागरिक बेचैन झाले होते.त्या पावसाने सगळ्याच्या अपेक्षा फोल केल्या परिणामी पाणी तुंबण्याचे प्रकार वाढले,असे मत नागरिक विदेश पेडणेकर यांनी व्यक्त केले.

दरम्यान, अलीकडे गुरांना सांभाळणे कठीण झाल्याने नांगरणी व अन्य कामे यंत्राच्या साहाय्याने केल्या जातात.नांगरणी मशीन भाडेपट्टीवर आणून रोप लावणे व नंतर मशीनच्या सहाय्याने कापणी व मळणी करणे यात शेतकरी अडकला आहे. त्यामुळे किमान पाऊस असल्यास अन्य कामे लागलीच पूर्ण होईल, असे मत शेतकरी व्यक्त करतात.

बामणभाटी देऊळवाडा रस्त्याच्यानजीक सुपीक शेतजमिनीत बांधकाम खात्याच्या बेपर्वाई पणामुळे साधारण एक एकर जागेत शेतीचे पिक घेणे अवघड झाले आहे.त्या शेत जमिनीत,डोंगरावरील पाणी साचून राहते,जमीनदार व्यक्तीने पलीकडे रस्ता उंच केला,परिणामी पाणी तुंबून राहते,पाणी जाण्यासाठी बांध किंवा पाईप्स टाकल्यास जमीन शेती करण्यास उपयुक्त होईल,असे मत शेतकरी दत्ताराम ठाकूर व अन्य शेतकऱ्यांनी केली आहे. सरकारचे कृषी खाते,शेती लागवडीसाठी अनेक उपाययोजना करीत आहेत,ही सुखद आहे.मात्र खात्याशी समन्वय साधून काही उपाययोजना केल्यास शेत जमीन लागवडीखाली येऊ शकते.कृषी, बांधकाम व जलस्त्रोत खात्याचे अधिकारी, उपजिल्हाधिकारी व गट विकास अधिकाऱ्यांनी पाहणी केली. मात्र उपाययोजना न करता निघून गेल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहे.

# पाठ्यपुस्तकांचा तुटवडा गंभीर : मडगावात अपुरा साठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान, पालकांमध्ये असंतोष**

**मडगाव, दि. १३ :** नवीन शैक्षणिक वर्षाचा आरंभ झाल्याने विद्यार्थ्यांनी अभ्यासात गती घेतली असली, तरी मडगावमधील अनेक शाळांमध्ये अजूनही पाठ्यपुस्तकांचा तुटवडा जाणवत आहे. गोवा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने पुरेसा साठा असल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना आवश्यक पुस्तके मिळत नाहीत, हे वास्तव आहे. इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी, हिंदी, कोकणीसह मानसशास्त्र, विज्ञान आणि पर्यायी भाषा (पोर्तुगीज व फ्रेंच) विषयांसाठी पाठ्यपुस्तके मिळवताना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

काही उच्च माध्यमिक शाळांनी दुसऱ्या हातातील पुस्तके स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. किरकोळ टिपण्या असलेली पुस्तकेही नाकारली जात असल्याने पालकांना नव्या प्रती खरेदी कराव्या लागत आहेत – ज्या सध्या उपलब्ध नाहीत.

ज्योती नाईक, या एका विद्यार्थिनीच्या आई, म्हणाल्या की, माझ्या मुलीला अकरावीच्या मानसशास्त्राचे पुस्तक हवे आहे. आम्ही मडगावातील सर्व दुकाने पालथी घातली, पण कुठेच साठा नाही. दुसरे पालक, अँड्र्यू फर्नांडिस, यांचे म्हणणे होते, बोर्ड म्हणतो की पुस्तके ऑनलाइन आहेत, पण प्रत्येकाकडे टॅबलेट किंवा इंटरनेट नसते. अभ्यास थांबवायचा का?

**बोर्डाचे स्पष्टीकरण, पण विरोधाभासी चित्र**

शिक्षण मंडळाचे अध्यक्ष भागीरथ शेट्ये यांनी सांगितले की ,माझ्या तपासणीत नववीच्या विज्ञान पुस्तकाव्यतिरिक्त इतर सर्व विषयांचे पुरेसे साठे आहेत. ही कमतरतेची चर्चा निराधार आहे.त्यांनी दीक्षा पोर्टलवर डिजिटल आवृत्त्या उपलब्ध असल्याचेही नमूद केले.

मात्र, हेराल्ड मीडियाच्या ग्राउंड रिपोर्टमध्ये या विधानाशी विरोधाभास दिसून आला. मडगावमधील पुस्तक विक्रेत्यांनी स्पष्ट सांगितले की, अकरावीच्या मानसशास्त्राच्या पुस्तकांचा साठा पूर्णपणे संपलेला आहे आणि नवीन प्रती कधी येतील याबाबत निश्चित माहिती दिली गेलेली नाही. एका पुस्तक विक्रेत्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, आमच्याकडे दररोज विचारणा होते, पण गेल्या अनेक आठवड्यांपासून आम्हाला या पुस्तकांचा नविन साठा मिळालेला नाही. बोर्डाने सांगितले आहे की हे पुस्तक पुन्हा छापले जाणार नाही.

या परस्परविरोधी माहितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये संभ्रम आणि चिंता वाढली आहे. शिक्षणात सातत्य राहावे यासाठी अनेक पालकांनी जुन्या पाठ्यपुस्तकांबाबत लवचिकता दाखवण्याची शिफारस केली आहे. मुलांचा अभ्यास थांबू नये, हे शाळांचे आणि बोर्डाचेही कर्तव्य आहे. अशी वेळ येऊ नये की पुस्तकांअभावी कुणी विद्यार्थी मागे पडेल, असे पालकांच्या एका प्रतिनिधींनी सांगितले.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी बोर्डाने तातडीने प्रिंटिंगचा निर्णय घ्यावा, शाळांनी दुसऱ्या हाताच्या पुस्तकांबाबत धोरण बदलावे तसेच डिजिटल माध्यमांचा पर्याय उपलब्ध करून देताना तांत्रिक पायाभूत सुविधांची खात्री करावी असे उपाय सुचवण्यात येत आहेत. शासनाने आणि शैक्षणिक अधिकाऱ्यांनी जमीनीवरील वास्तवाचा स्वीकार करून तातडीने पावले उचलली, तरच हा तुटवडा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा ठरणार नाही.

# शाळांच्या आसपास तंबाखू बंदीची कडक अंमलबजावणी

## सीओटीपीए कायद्यांतर्गत दक्षिण गोव्यात ५ महिन्यात १४७४ गुन्हे दाखल

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १३ :** दक्षिण गोव्यातील पोलिस ठाण्यांनी सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (सीओटीपीए ) कायद्याच्या उल्लंघनांविरुद्ध कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः शैक्षणिक संस्थांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू विक्रीवर बंदी लागू करण्याच्या अनुषंगाने स्थानिक पोलिसांना दुकानदारांना सूचित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सांगे पोलिस ठाण्याचे निरीक्षक दितेंद्र नाईक यांनी सांगितले की, बीट पातळीवरील पोलिसांना तंबाखू विक्री करणाऱ्या दुकानदारांना भेट देण्याचे आदेश देण्यात आले असून, शाळा आणि महाविद्यालयांच्या १०० यार्डच्या परिसरात तंबाखू उत्पादने विकण्यास बंदी असल्याचे स्पष्ट करण्यास सांगितले आहे.

सीओटीपीए कायद्यानुसार, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान, तसेच १८ वर्षांखालील व्यक्तींना तंबाखू विक्री, शैक्षणिक संस्थांच्या आसपास विक्री आणि जाहिरातींवर बंदी आहे.




वकील विनय पाटकर यांनी सांगितले की, हा कायदा चित्रपटगृह, रुग्णालये, सार्वजनिक वाहतूक, कार्यालये, न्यायालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये धूम्रपानास मनाई करतो. विक्रेत्यांनी खरेदीदाराचे वय पडताळणे आवश्यक आहे, पण दुर्दैवाने हे नियम पाळले जात नाहीत, त्यामुळे अल्पवयीन मुलांमध्ये तंबाखूच्या सवयी वाढत आहेत.

त्यांनी सीओटीपीए कायद्याच्या कलम ६(ब) चा हवाला देत सांगितले की, शाळा आणि महाविद्यालयांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू उत्पादनांची विक्री करण्यास मनाई असून, याचा उद्देश तरुणांमध्ये तंबाखू सेवनास आळा घालणे हा आहे.

२०२५ च्या एप्रिल अखेरपर्यंत दक्षिण गोव्यात या कायद्यांतर्गत १४७४ गुन्हे नोंदवले गेले आहेत. यामध्ये वास्को रेल्वे पोलिस ठाण्यात सर्वाधिक १९४ गुन्हे, मडगावमध्ये १८३ आणि दाबोळी विमानतळावर १७० गुन्हे नोंदवण्यात आले. २०२४ मध्ये सीओटीपीए अंतर्गत एकूण ५४८० गुन्हे नोंदवले गेले होते, जे या कायद्याच्या अंमलबजावणीची व्याप्ती स्पष्ट करतात.

निवृत्त शिक्षक मिचल फर्नांडिस म्हणाले की, शाळांनी विद्यार्थ्यांना तंबाखूच्या दुष्परिणामांबद्दल सतत मार्गदर्शन दिले पाहिजे. कायद्याच्या कलम ६(अ) नुसार १८ वर्षांखालील मुलांना तंबाखू उत्पादने विकणे हा गंभीर गुन्हा आहे. पालक मिलिंद रायकर यांनी राज्य सरकार आणि पोलिसांकडून अधिक प्रभावी अंमलबजावणीची गरज व्यक्त केली. तंबाखूविरोधी जनजागृती मोहिमा नियमितपणे राबवणं गरजेचं आहे, कारण सार्वजनिक आरोग्य ही राज्याची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले. दुसरे पालक संदीप पेडणेकर म्हणाले, पालकांनी घरामध्ये तंबाखूविरोधी संस्कार रुजवणं गरजेचं आहे. संवाद, शिक्षण आणि स्वतःच्या वर्तनातून मुलांना सकारात्मक दिशा देता येते.

शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखू विक्रीवर बंदी लागू करण्यासाठी पोलिस यंत्रणा हालचालीत आली असली तरी कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी आणि पालक–शाळा यांच्या संयुक्त प्रयत्नांमधूनच युवावर्गाला या व्यसनापासून दूर ठेवता येईल, हे चित्र स्पष्ट होत आहे.

# दीर्घकाळ पार्किंगवर होणार कडक कारवाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १३ :** राज्यात रस्ते सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थापन सुधारण्याच्या दिशेने सरकारने मोठे पाऊल उचलत रस्त्याच्या कडेला दीर्घकाळ वाहन पार्किंग आणि अनधिकृत गॅरेजविरुद्ध कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी फातोर्डा येथे नवीन वाहतूक कक्षाच्या उद्घाटनप्रसंगी हा इशारा दिला.

जे वाहन मालक आपली वाहने आठ दिवसांपेक्षा अधिक काळ रुंदीकरण झालेल्या रस्त्यांवर पार्क करून ठेवतात, त्यांच्यावर तात्काळ कारवाई केली जाईल. अशा वाहनांना आधी नोटीस दिली जाईल आणि नंतर त्यांना सरकारी स्क्रॅप यार्डमध्ये हलवले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी पुढे सांगितले की, ही वाहने स्क्रॅप यार्डमध्ये गेल्यानंतर त्यावर कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी यावेळी रस्त्यांवरील निष्काळजीपणामुळे वाढत्या पादचाऱ्यांच्या मृत्यूंचा मुद्दा उपस्थित करत राज्यातील वाहतूक शिस्तीवर चिंता व्यक्त केली. वाहनांची संख्या वाढत असली तरी वाहतूक नियमांचे पालन होताना दिसत नाही. यामुळे अपघात आणि पादचाऱ्यांचे मृत्यू वाढले आहेत, जे आम्ही सहन करणार नाही,असे त्यांनी ठामपणे सांगितले.

सरकारने सार्वजनिक वाहतूक अधिक कार्यक्षम करण्यावर भर दिला असून, वाहतूक उल्लंघनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना राबवण्याचे संकेत मुख्यमंत्री सावंत यांनी दिले. यामध्ये कॅमेरे, डिजिटल ट्रॅकिंग सिस्टीम आणि स्मार्ट वाहतूक उपायांचा समावेश असणार आहे. या कार्यक्रमात उपस्थित फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी नवीन वाहतूक कक्ष स्थापन केल्याबद्दल सरकारचे आभार मानले. त्यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले, नियम मोडणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि दंड प्रक्रिया जलद व्हावी म्हणून रस्त्यांवर पाळत ठेवणारे कॅमेरे बसवणे आवश्यक आहे. फातोर्डाला प्रगतीशील मतदारसंघ म्हणून पुढे न्यायचे असेल तर वाहतूक शिस्त अत्यावश्यक आहे.

मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट आदेश दिले की, शहरांमध्ये रस्त्याच्या कडेला बेकायदेशीरपणे चालवले जाणारे गॅरेज तात्काळ हटवले जातील. या कारवाईचा उद्देश फूटपाथ आणि रस्त्यांची अडथळेमुक्त उपलब्धता सुनिश्चित करणे आणि वाहतूक सुरळीत ठेवणे आहे. मुख्यमंत्र्यांच्या या घोषणांमुळे राज्याच्या वाहतूक धोरणाला स्पष्ट दिशा मिळाल्याचे जाणवते. वाहतूक शिस्त, सुरक्षितता आणि सार्वजनिक वाहतुकीची गुणवत्ता यावर भर देण्याचे सरकारचे प्रयत्न आता अधिक दृढ होत आहेत. संबंधित यंत्रणांनी आणि नागरिकांनी यामध्ये सक्रिय सहकार्य केल्यास गोवा लवकरच एक सुरक्षित आणि सुसंस्कृत वाहतूक संस्कृती असलेले राज्य ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.